# महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720

फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


जा.क्रं./ प्रेस नोट/427/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 23/11/2024

## 1)घरफोडी :-

**भाग्यनगर :-** दिनांक 08.11.2024 रोजी 09.00 ते दिनांक 19.11.2024 चे 10.30 वा. चे दरम्यान, **राधीकानगर मंगल कार्यालयाचे समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे घराचे चॅनलगेटचे व दरवाज्याचे कुलूप तोडुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने आत प्रवेश करून घरातील सोन्याचे दागीने 2,34,293 व नगदी 89,000/-रू असा एकुण 3,23,293/-रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अन्नाराव पि. गोविंदराव लांडगे, वय 61 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. राधिकानगर मंगलकार्यालयाचे समोर नांदेड,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 586/2024 कलम 331(3), 331(4), 305 भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मस्के, मो.नं. 9011097665** हे करीत आहेत.

## 2)चोरी :-

**1)कुंडलवाडी :-** दिनांक 22.11.2024 रोजी 11.25 वा. चे सुमारास, **कुंडलवाडी ते धर्माबाद रोडवर महालक्ष्मी मंदिराचे पाठीमागे कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे कुंडलवाडी येथील चुंगी नाका जवळील बँक ऑफ बडोदा शाखेतुन चेकद्वारे काढलेले 2,70,000/-रू पिशवीमध्ये ठेवुन आपले मोटार सायकलने धर्माबाद येथे जात असतांना कुंडलवाडी ते धर्माबाद रोडवर महालक्ष्मी मंदीरचे पाठीमागे रोडवर आले असता मागुन एका मोटार सायकलवर दोन व्यक्ती येवुन तुमचे पैसे खाली पडले आहेत म्हणुन निघुन गेले. फिर्यादीने गाडीवरून उतरून मागे पाहीले असता मागुन मोटार सायकलवर एक अनोळखी व्यक्ती येवुन फिर्यादीचे गाडीवर ठेवलेली पैशाची पिशवी घेवुन चोरून वेगात निघुन गेला. वगैरे **फिर्यादी आत्माराम गंगाराम देगावे, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. दौलापुर ता. बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 189/2024 कलम 303(2), 3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2821 चव्हाण, मो.नं. 9923588117** हे करीत आहेत.

**2)माहुर :-**दिनांक 22.11.2024 रोजी 14.40 वा. चे सुमारास, **बसस्थानक माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयांनी फिर्यादी यांचे पर्स मधील नगदी 24,500/-रू पर्सची चैन काढुन गर्दीचा फायदा घेऊन चोरून नेले. . वगैरे **फिर्यादी चंद्रकला हरिचंद्र पवार, वय 48 वर्षे, व्यवसाय अंगणवाडी सेविका रा. चोरड (मळी) ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 158/2024 कलम 303(2), भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1326, चौधरी, मो.नं. 9158134034** हे करीत आहेत.

**3)शिवाजीनगर :-**दिनांक 22.11.2024 रोजी 18.45 वा. चे सुमारास, **विसावानगर 26 नंबर रोडवर नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.प्रेम कमलाकर गायकवाड, वय 18 वर्षे, रा. तेहरानगर नांदेड 2. एक विधीसंघर्ष बालक यांनी संगणमत करून फिर्यादी हा बाजार करण्यात व्यस्त असतांना फिर्यादीचे पॉकेट चोरले सदर पॉकेट मध्ये नगदी 5,000/-रू, पॅनकार्ड, एचडीएफसी बँकेचे चे एटीएम कार्ड, आयसीआयसी बँकेचे एटीएम कार्ड, व दुचाकी चारचाकी वाहन परवाना चोरतांना फिर्यादीस समजताच फिर्यादीने त्यांना पकडुन त्याची विचारपुस करत व्हिडीओ बनवतांना आरोपीतांनी पॉकेट कुठेतरी लपवुन विधीसंघर्ष बालकाने दुसऱ्या आरोपीस चॉपर काढ याला खत्तम करतो अशी धमकी देत शिवीगाळ करून मारहाण करून डोक्यात दगडाने मुक्का मार मारून पळुन गेले. वगैरे **फिर्यादी जिवन जैवंतराव शिंदे, वय 34 वर्षे, रा. पांडुरंगनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 474/2024 कलम 303(2), 118(1), 115(2), 352, 351(3), 3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/43 पाटील, मो.नं. 8805013616** हे करीत आहेत.

## 3)अवैध रेती चोरी :–

**बिलोली :–** दिनांक 22.11.2024 रोजी 01.00 वा. चे सुमारास, **बोधन रोडवर कारला बुद्रुक शिवार ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.मैनोदीन बाबुराव शेख, वय 42 वर्षे, व्यवसाय चालक रा. कुनुमारपल्ली ता. देगलुर 2. अजय बालाजी, वय 19 वर्षे, रा. सनपुर ता. औराद जि. बिदर यांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या आरोपी क्रं 1 च्या ताब्यातुन अशोक कंपणीचा टिपर क्रमांक केए–28/बी–6297 किंमती 20,00,000/–रू मध्ये 4.5 ब्रास रेती किंमती 15,000/–रू असा एकुण 20,15,000/–रू ची व आरोपी क्रं 2 च्या ताब्यातुन अशोक लिलँण्ड कंपणीचा टिपर क्रमांक टीएस–12/युव्ही–4269 किंमती 20,00,000/–रू चा मेध्य 4.5 ब्रास रेती किंमती 15,000/–असा एकुण 5,15,000/–रू चा दोन्ही मिळुन 9 ब्रास रेती किंमती 30,000/–रू दोन टिपरची किंमत 40,00,000/– असा एकुण 40,30,000/–रू रेतीची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1485, निरंजन पि. माधवराव अंबुरे, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 322/2024 कलम 303(2), 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री शिंदे ज्ञानेश्वर, मो. क्रं. 9096955912** हे करीत आहेत.

## 4)मो.सा.चोरी :–

**वजिराबाद :–** दिनांक 16.11.2024 रोजी 10.30 ते 11.15 वा. चे दरम्यान, **कदम हॉस्पीटल व विठाई हॉस्पीटलच्या समोरून नांदेड येथे,** यातील फिर्यादची एच एफ डिलक्स ड्रम कास्ट कंपणीची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/बीझेड–9517 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी वैभव चांदराव जाधव, वय 34 वर्षे, व्यवसाय किराणा दुकान रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 567/2024 कलम 303(2) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/11 सोनटक्के, मो.नं. 8805007511** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :–

**देगलुर :–** दिनांक 22.11.2024 रोजी 01.52 वा. चे सुमारास, **उपजिल्हा रूग्णालय देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे शेख आयुब शेख ईसाक, रा. देगलुर नाका मस्जीद जवळ गुलशन कॉलनी नांदेड याने उपजिल्हा रूग्णालय देगलुर येथे जावुन कर्तव्यावर असलेल्या फिर्यादी डॉक्टरांना पेशंटरवर तुम्ही बरोबर उपचार करीत नाहीत म्हणुन दवाखान्यात धिंगाना घालुन शिवीगाळ करून शासकीय कर्तव्य पार पाडण्यास अडथळा निर्माण केला. त्यावेळी दवाखान्यात हजर गार्डवरील कर्मचारी हे आरोपीस समजावुन सांगत असतांना गार्डच्या हातातील मोबाईल फोडुन नुकसान केले. वगैरे **फिर्यादी डॉ. रवि हाणमंत काळे, वय 39 वर्षे, व्यवसाय नौकरी वैद्यकिय अधिकारी उपजिल्हा रूग्णालय देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 541/2024 कलम 132, 352, 324(4), भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो.क्रं. 9130087444** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :–

**वजिराबाद** :– दिनांक 15.11.2024 रोजी 09.15 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरी व्यंकटेश कुंज उर्फ चुडावेकर होम गोवर्धनघाट रोड नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.सुनिलकुमार यादव, 2.अनिल यादव, दोघे रा. दिल्ली 3. 911180485780 मो. धारक यांनी संगणमत करून यातील फिर्यादीचा मो.क्रं. 8055139757 यावर 911180485780 व मो.क्रं. 9058936106 संनिलकुमार दिल्ली पोलीस, मो.क्रं. 9571407941 अनिल यादव तोतया सीबीआय दिल्ली असे खोटे बोलुन व्हॉटअसअप वरून वेळोवेळी फोन करून फिर्यादी यांचे विरूध्द दिल्ली एअरपोर्टवर गुन्हा दाखल असुन अटक वॉरंट निघाले असल्याचे वॉरंट पाठवुन फिर्यादीच्या खात्यामधील पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी बंधन बँकेचे खाते क्रमांक 20100032072440 मधुन 4,30,000/–रू व पंजाब अँण्ड सिंध बँक अकाउँट क्रमांक 04581000111789 मधुन 2,50,000/–रू तसेच वॉरंट रद्द करण्यासाठी मोबाईल क्रमांक 9058936106 यावर 5,000/–रू व 10,000/–रू गुगल पे द्वारे पैसे घेवुन फिर्यादीचे एकुण 6,95,000/–रू ची आर्थिक फसवणुक करून आयटी कायदाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी अमोल दिपकराव लव्हेकर, वय 42 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. देवूळ गल्ली लोहा ता. लोहा ह. मु. व्यंकटेश कुंज उर्फ चुडावेकर होम गोवर्धन घाट रोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं. 568/2024 कलम 318(4), 3(5), बीएनएस सह कलम 66(डी), आयटी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री परमेश्वर कदम, मो.नं. 8693828777** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :—

**1)कुंडलवाडी :—** दिनांक 18.11.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **कुंडलवाडी ते अर्जापुर येथे शेख मस्तान यांचे वीट भटटी जवळ ता. बिलोली जि. नांदेड येथे** यातील आरोपी नामे 1.मोहन नागोराव समेटवार, वय 34 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. पोचम्मा गल्ली कुंडलवाडी यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 18,240/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/364 रविंद्र सुधाकर देशमुख, ने. पोस्टे कुंडलवाडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 188/2024 कलम 65(ई), म.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2021 चव्हाण,** मो.नं... हे करीत आहेत.

**2)रामतिर्थ :—** दिनांक 22.11.2024 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **आदमपुर बसस्थानक समोर रोडवर ता. बिलोली जि. नांदेड येथे** यातील आरोपी नामे 1.हनुमंत उर्फ बाबु मारोती पेटकर, वय 50 वर्षे, व्यवसाय ॲटो चालक रा. खतगाव ता. बिलोली यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3840/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1451, चेतन विठ्ठलराव कत्ते, ने. पोस्टे रामतिर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं 296/2024 कलम 65(ई), म.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/65 जांभळीकर,** मो.नं. 9518991265 हे करीत आहेत.

## 8)विषारी साप चावुन मृत्यु :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 22.11.2024 रोजी 13.10 वा. चे सुमारास, **पंकजनगर धनेगांव नांदेड (सरकारी दवाखाना विष्णुपुरी दवाखाना वार्ड क्रं 15) ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे वैष्णवी दत्ता सुर्यवंशी, वय 13 वर्षे, रा. बीगबाजार समोर कौठा नांदेड** ही पंकजनगर येथे घरी पलंगावर झोपली असतांना कोणतातरी विषारी साप चावल्याने उपचार कामी सरकारी दवाखाना विष्णुपरी येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान मरण पावली. वगैरे **खबर देणार दत्ता विठ्ठल सुर्यवंशी, वय 43 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, रा. बिगबाजार समोर कौठा नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **पोस्टे नांदेड ग्रामीण आ. मृ. 169/2024** कलम 194 भारतीय नागरीक संहीता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2240, व्यवहारे,** मो.नं. **9823827173** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड